# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.04.2025** **वार:सोमवार**

---

1. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात आयोजित विशेष पदयात्रांमध्ये विद्यार्थी आणि तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग
3. राज्यातल्या 80 टक्के शेतकऱ्यांना पुढच्या वर्षाच्या अखेरपर्यंत बारा तास मोफत वीज उपलब्ध करुन देणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही आणि
4. नाशिक, जळगांवमध्ये पावसामुळे पिकांचं नुकसान

**बाबासाहेब आंबेडकर जयंती**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज 134 वी जयंती आहे. या निमित्त संपूर्ण देशभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात येत आहे. डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

डॉक्टर आंबेडकर हे विलक्षण क्षमता असलेले बहुआयामी व्यक्तिमत्व होते, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही असाधारण कार्य करून त्यांनी जगभरात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. महिला आणि वंचित वर्गाच्या आर्थिक आणि सामाजिक हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या डॉक्टर आंबेडकर यांचं जीवन कार्य प्रेरणादायी आहे, असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी दादरच्या चैत्यभूमीवर, तसंच नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर हजारो अनुयायी दाखल झाले आहेत. त्यांच्या सोयी-सुविधेसाठी प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे.

मुंबई महानगर प्रदेशचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी आणि अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार यांनी काल दादर इथल्या इंदू मिल परिसरातल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक प्रकल्पाचा आढावा घेतला. हे स्मारक वेळेत पूर्ण व्हावं, तसंच ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अजरामर कार्याला साजेसं गौरवचिन्ह ठरावं, अशी अपेक्षा मुखर्जी यांनी यावेळी व्यक्त केली.

**रक्षा खडसे**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर काल राज्यासह देशभरात विविध ठिकाणी जयभीम पदयात्रा काढण्यात आली. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी बिहारमध्ये पाटणा इथं या पदयात्रेला हिरवा झेंडा दाखवला. तर केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत मुंबईत नरिमन पॉइंटपासून मंत्रालयातील डॉक्टर आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत हजारो तरुणांचा सहभाग होता. यावेळी बोलताना रक्षा खडसे म्हणाल्या........

**जे आपले महापुरुष आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उद्या जयंती आहे. त्यांच्या विचारांना घेऊन पुढे आपल्याला या देशाला विकसित बनवायचं आहे जयंती ही कोणत्याही महापुरुषाची फक्त एक दिवसापुरती साजरी न**

**करता त्यांच्या विचारांना घेऊन आजचा युवा हा पुढे कसा जाऊ शकतो हा संदेश या पदयात्रेच्या माध्यमातून आम्ही सगळ्या देशभरातल्या युवकांना दिलेला आहे.**

**<u>जयभीम पदफेरी</u>**

राज्यात इतर जिल्ह्यातही काल जयभीम पदफेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. धुळे शहरात गरुड मैदान इथं असलेल्या आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करुन पदयात्रेला प्रारंभ झाला. यामध्ये शहरातल्या विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी मैदान तसंच पुतळ्याजवळील परिसराची स्वच्छताही केली. या पदफेरीत सहभागी झालेल्या एका विद्यार्थिनीने तिची प्रतिक्रिया व्यक्त केली.....

**शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा विकत परिस्थितीत अभ्यास करून ज्ञान मिळून ज्यांनी भारताचे संविधान लिहिले, मी त्यांच्या कडून एकाच गुण घेईल कि मी पुढे जाऊन त्यांच्या मार्गावर चालेल.**

नांदेड शहरात जिल्हा क्रीडा संकुल वसतिगृहापासून आंतरराष्ट्रीय खेळाडू सृष्टी जोगदंड यांच्या हस्ते या पदयात्रेला प्रारंभ झाला. परभणीतही जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पदफेरीचे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वसतीगृहातील विद्यार्थिनींनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. रत्नागिरीत उपशिक्षणाधिकारी नरेंद्र घावंड यांनी आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला; त्यानंतर हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेला सुरुवात झाली. धाराशिवमध्ये नागरिकांनी पदयात्रेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तसंच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आलं.

**<u>रामशिंदे-नांदेड</u>**

नांदेडमध्ये अहिल्यादेवी होळकर यांचं स्मारक उभारण्याची मागणी अनेक वर्षापासून होत आहे; या अनुषंगाने पुढच्या वर्षापर्यंत, म्हणजेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 व्या जयंतीपर्यत त्यांचं स्मारक उभारण्यात येईल, अशी ग्वाही विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी दिली. नांदेड दौऱ्यावर आलेल्या प्राध्यापक शिंदे यांचा काल सत्कार करण्यात आला; त्यावेळी ते बोलत होते.

**<u>मुख्यमंत्री वर्धा</u>**

राज्यातल्या 80 टक्के शेतकऱ्यांना पुढील वर्षी डिसेंबरपर्यंत वर्षभर बारा तास मोफत वीज उपलब्ध करुन देणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल वर्धा इथं दिली. आर्वी इथं 720 कोटीं रुपयांच्या विविध विकास कामांचे ई-लोकार्पण, भूमिपूजन तसंच नवीन प्रशासकीय इमारतीचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यातून जाणाऱ्या समृध्दी महामार्गावरील नोडवर एमआयडीसी उभारुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**समृद्धी महामार्गामुळे वर्धा जिल्हा हा एक अत्यंत महत्त्वाचा जिल्हा झालेला आहे. आता शक्ती पीठ महा मार्ग देखील या ठिकाणाहून सुरु होणार आहे. आणि या दोन महा मार्गामुळे एक प्रकारे सेंट्रल इंडियाचं लॉजिस्टिक सेंटर हे आपल्या वर्धा जिल्हा या ठिकाणी होत आहे. हे निश्चितपणे आपल्या सर्वांना सांगाचं आपल्या या समृद्धी महामार्गामुळे जे लोड तयार झालेले त्या लोडवर रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत. आज आपण बघतो आहे की मोठ्या प्रमाणात इनव्हेस्मेंट आपल्या विदर्भात येत आहे. आता मी दावोसला असताना जवळपास साधे 16 लाख कोटी रुपयाची इनव्हेस्मेंट त्या ठिकाणी आली त्यातली मला सांगताना आनंद वाटतो की जवळ पास 7 लाख कोटी हे आपल्या विदर्भात आलेले आहे**

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे वर्ध्यासह विदर्भातील दहा जिल्ह्यामधील काही दुष्काळग्रस्त भाग सुजलाम सुफलाम होणार असल्याचे सांगून गोसीखुर्द धरणातील 62 टीएमसी सांडव्याद्वारे नव्याने साडेपाचशे किलोमीटरची नदी तयार करण्यात येईल. त्यासाठी 1 लाख कोटींची तरतूद करण्यात आली असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

**<u>मुख्यमंत्री-नवीमुंबई</u>**

निर्वासित सिंधी समाज ज्या शिबिरात राहिले ती शिबिरं आणि प्रार्थनास्थळं यांना नियमित करण्यासाठी त्या जागा 'फ्री होल्ड' करून त्यांना देण्याविषयी निर्णय घेऊन त्याची सुरूवात केली आहे; असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी मुंबईत सांगितला. पंजाबी समाजाच्या माध्यमातून नवी मुंबईतल्या सानपाडा इथं आयोजित करण्यात आलेल्या गुरमत समागम या कार्यक्रमात ते बोलत होते. गुरू ग्रंथ साहेब या ग्रंथातून केवळ शिखांच्या कल्याणाचाच नव्हे तर संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा विचार मिळाला आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<u>तुळजाभवानी-धाराशिव</u>**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या चैत्री पौर्णिमा यात्रेला गुढी पाडव्यापासून प्रारंभ झाला. या यात्रेदरम्यान तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. नुकत्याच झालेल्या चैत्र पौर्णिमेनिमित्त देवीच्या गाभाऱ्यात विविध आकर्षक फुलांसह आंब्याची आरास करून सिंहासनाला आंब्याच्या मोहराची सजावट करण्यात आली होती. येरमाळा इथल्या येडेश्वरी यात्रेलाही प्रारंभ झाला असून काल येडेश्वरी यात्रा महोत्सवातील चुनखडी वेचण्याच्या कार्यक्रमासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

**<u>क्रिकेट</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल रात्री दिल्लीत झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं दिल्ली कॅपिटल्सचा 12 धावांनी पराभव केला. तर जयपूरमधल्या दुसऱ्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं राजस्थान रॉयल्सचा 9 गडी राखून पराभव केला.

**<u>पाऊस-नशिक-जळगाव</u>**

नाशिक जिल्ह्यातील येवला आणि निफाड तालुक्यात काल अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. अनेक ठिकाणी उन्हाळ कांदा काढणी सुरू आहे; त्यातच अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची एकच धांदल उडाली. येवल्यात राजापूर, पन्हाळसाठे परिसरामध्ये गारांचा पाऊस पडल्याने काढून ठेवलेला कांदा भिजला आहे.

जळगाव जिल्ह्यातील रावेर, मुक्ताईनगर, बोदवडमध्येही वादळी वारे, गारपीट आणि पावसामुळे शेतपिकांचं नुकसान झालं आहे. रावेर, भोकर, भादली खुर्द परिसरामध्ये केळी आणि मका पिकांचं नुकसान झालं आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रशासनाला पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून दक्षिण महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.